# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २०/०६/२०२४ (गुरूवार)

---

### पोलीस भरतीचे उमेदवार यांची रात्रीसाठी राहण्याची व्यवस्था

नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालय टेका नाका नागपूर येथे दिनांक १९/०६/२०२४ पासुन सुरू झालेल्या पोलीस भरती प्रक्रीया मध्ये मोठया संख्येने उमेदवारांनी अर्ज केलेले आहे. पोलीस भरती करीता विविध जिल्हयातून उमेदवार हे पोलीस मुख्यालय येथे एक दिवसा अगोदर भरती प्रक्रीयेसाठी येत आहेत. उमेदवार यांची राहण्याची सोय नसल्याने मुख्यालय परीसरात फुटपाथवर झोपतात आणि सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने उमेदवार यांची गैरसोय होणार नाही यासाठी **मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार** यांनी दखल घेवुन उमेदवारांची निशुल्क राहण्याची व्यवस्था महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ललित कला भवन, इंदोरा नागपूर येथे करण्यात आलेली आहे. सदर राहण्याची सोयकरीता पोलीस निरीक्षक महेश मुंडे, मोटार परीवहन विभाग मो. क्र. ९९२३४०५४६४ यांचेशी उमेदवारांनी संपर्क साधावा.

### अवैध रेतीची (गौणखनिज) चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १९/०६/२०२४ चे २०/४० वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत अवैध रेती उत्खनन व वाहतूक प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय खबर द्वारे माहिती मिळाली की, मोहखेडी नदीतून अवैध रित्या रेती उत्खनन करून वाहतूक केल्या जात आहे. प्राप्त खबरे नुसार मौजा वांझरा शिवारात मोहखेडी ते मौदा रोड वर नाकाबंदी करून रेती वाहतुकीच्या आयसर ट्रॅक्टर ला थांबवून पाहणी केली असता विनाक्रमांकचे आयसर व त्याला जोडलेल्या ट्रॉली क्रमांक MH 36/8356 मध्ये अंदाजे १ ब्रास रेती मिळून आली. ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगून मोहखेडी नदीच्या पात्रातून रेती भरून आणल्याचे सांगितले. सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने विना क्रमांकचा आयसर ट्रॅक्टर व त्याला जोडलेल्या ट्रॉली क्रमांक MH 36/ 8356 किं. रु. ५,००,०००/— तसेच त्यामधील १ ब्रास रेती किंमती रु. ४०००/— असा एकूण रु. ५,०४,०००/— चा मुद्देमाल जप्त करून ट्रॅक्टर चालक व मालक नामे मयूर लक्षण मेश्राम, वय २८ वर्ष, रा. नाथ नगर, मौदा जि. नागपूर याचे विरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, स.फौ. भगवान चांदेवार, पो.अं. प्रज्वल नंदेश्वर यांनी केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर